# भिवंडी पुर्व विधानसभा मतदार संघात 2 कोटी 30 लाख 17 हजार 600 रुपयांची रोकड जप्त

**भिवंडी, दि. ५ : प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ठाणे जिल्ह्यातील सर्वच ठिकाणी वाहनांची कसून तपासणी करण्यात येत आहे. याच पार्श्वभूमीवर सोमवारी ४ नोव्हेंबर रोजी धामणकर नाक्याजवळ सहाय्यक पोलीस आयुक्त सचिन बापू सांगळे यांना मे.सीएमएस या कंपनीची रोख रक्कम घेवुन जाणारी संशयित गाडी क्र. एमएच ४३/हिपी/७९२० ही सायंकाळी ७:४५ वा. वे सुमारास आढळून आली. संबंधीत गाडी चालकास गाडीतील रोख रक्कमेबाबत विचारणा केली असता सदर रोकड ही मे.सीएमएस या कंपनीची असल्याचे नमुद केले पण रक्कमे बाबत पुरावे व रोख रक्कम हाताळणी क्युआर कोड सादर करता आला नाही. त्यामुळे निवडणूक आचारसंहिता पथकाने कारवाई करीत रक्कम जप्त केली आहे. शहरातील धामणकर पोलिसांना रोख रक्कम घेऊन जाणार असल्याची माहिती मिळाल्यानंतर आचारसंहिता पथकातील हेमंत पष्टे हे तत्काळ घटनास्थळी हजर झाले.त्यांच्या परवानगीने सदर वाहनात असलेल्या बॅगमधील व एटीएम मशिनमध्ये भरावयाच्या सिल ट्रे मधील रोख रक्कमेची गणना केली असता त्यामध्ये एकुण रुपये २ कोटी ३० लाख १७ हजार ६०० रक्कम आढळून आली.याबाबतची माहिती आयकर निरीक्षक (अन्वेषण शाखा) पवन कौशिक कल्याण यांना दिल्याने ते समक्ष हजर राहिले होते.त्याचप्रमाणे आचारसंहिता पथक प्रमुख सुधीर गुरव व सहाय्यक खर्च निरीक्षक शरद यादव यांच्या मार्गदर्शनाखाली सदर पंचनामा पूर्ण करण्यात आला आहे. हि सर्व रक्कम जप्त करण्यात आली असून ती रक्कम सिलबंद करुन भिवंडी कोषागार विभागात जमा करण्यात आली आहे. याबाबत आयकर विभाग अधिक तपास करून अहवाल सादर करणार आहेत.त्यानंतर पुढील योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल,अशी माहिती १३७ भिवंडी पुर्व विधानसभा मतदार संघाचे निवडणूक निर्णयअधिकारी अमित सानप यांनी दिली. दरम्यान तत्पूर्वी कांबे ग्रामपंचायत हद्दीतील तलवली नाका येथे भरारी पथकाने ३ लाख ७५ हजार रुपयांची रोकड जप्तीची कारवाई केली होती.




# विधानसभा निवडणुकीसाठी यंत्रणा सज्ज

## 4 हजार 140 अंतिम उमेदवार - मुख्य निवडणूक अधिकारी एस.चोक्कलिंगम

**मुंबई, दि. ५ : प्रतिनिधी**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक सन 2024 साठी राज्यातील एकूण 288 विधानसभा मतदारसंघासाठी एका टप्प्यांमध्ये दिनांक 20 नोव्हेंबर रोजी मतदान घेण्यात येणार आहे. या निवडणुकीसाठी यंत्रणेची सर्व तयारी पूर्ण झाली असून या निवडणुकीतील अंतिम उमेदवारांची संख्या 4 हजार 140 असल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकारी तथा प्रधान सचिव एस.चोक्कलिंगम यांनी आज दिली.

मंत्रालय व विधीमंडळ वार्ताहर संघाच्या पत्रकार कक्षात आयोजित पत्रकार परिषदेत श्री.चोक्कलिंगम बोलत होते. यावेळी अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी डॉ.किरण कुलकर्णी, अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी पी.प्रदीप उपस्थित होते.

श्री.चोक्कलिंगम यांनी सांगितले की, राज्यातील लोकसभेच्या 16 - नांदेड या एका लोकसभा मतदारसंघात सुद्धा दिनांक 20 नोव्हेंबर, 2024 रोजी पोटनिवडणूक घेण्यात येणार आहे. राज्यातील विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024 साठी नामनिर्देशनपत्रे सादर करण्याचा अंतिम दिनांक 29 ऑक्टोबर 2024 असा होता. त्यानुसार 288 विधानसभा मतदारसंघासाठी एकूण 7,078 इतके नामनिर्देशन पत्र दाखल



करण्यात आले. त्यापैकी एकूण 2,938 अर्ज मागे घेण्यात आले.

### मतदार नोंदणीत वाढ

दि.30 ऑक्टोबर रोजी अद्ययावत मतदारांची संख्या 9,70,25,119 असून यामध्ये पुरुष मतदार 5,00,22,739 तर महिला मतदार 4,69,96,279 आहे. तर 6,101 तृतीयपंथी मतदारांची नोंदणी झाली आहे. दिव्यांग (PwD Voters) मतदारांची एकूण संख्या 6,41,425 इतकी असून सेना दलातील (Service Voters) मतदारांची संख्या 1,16,170 आहे.

### राज्यामध्ये अतिउंच इमारती/सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या संकुलात 1,181 मतदान केंद्रे

मतदारांच्या संख्येच्या प्रमाणात मतदान केंद्राच्या संख्येत वाढ केली असून राज्यात एकूण मतदान केंद्रे 1,00,186 आहेत. यामध्ये शहरी मतदान केंद्र 42,604 तर ग्रामीण मतदान केंद्र 57,582 इतकी आहेत. शहरी भागातील मतदारांची अनास्था विचारात घेऊन शहरी भागातील मतदारांनी जास्तीत जास्त मतदान करावे, यासाठी राज्यामध्ये पुणे, मुंबई, ठाणे, इ. शहरांमध्ये अतिउंच इमारती/सहकारी गृहनिर्माण संस्थांची संकुले यामध्ये एकूण 1,181 मतदान केंद्र उभारण्यात आलेली आहेत. तसेच झोपडपट्टी भागात 210 मतदान केंद्र उभारण्यात आलेली आहेत. सहाय्यक मतदान केंद्रांची एकूण संख्या 241 इतकी आहे.

### ईव्हीएम व्हीव्हीपॅट EVM-VVPAT

राज्यामध्ये विधानसभा निवडणुकीसाठी पुरेशा संख्येने ईव्हीएम उपलब्ध असून पुरेसा साठा आहे. महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024 च्या अनुषंगाने 1,00,186 इतक्या मतदान केंद्रांसाठी 2,21,600 बॅलेट युनिट (221 %), 1,21,886 कंट्रोल युनिट (122 %) व 1,32,094 व्हीव्हीपॅट (132 %) इतक्या प्रथमस्तरीय तपासणी मशिन्स उपलब्ध असून एकूण प्रथमस्तरीय करण्यात आलेल्या ईव्हीएम पैकी प्रशिक्षण व जनजागृतीच्या कार्यक्रमाकरिता त्यापैकी 5166 बॅलेट युनिट, 5166 कंट्रोल युनिट व 5165 व्हीव्हीपॅट इतक्या

# मतदारसंघातील वातावरण पूरक होईल असा प्रयत्न केला जाईल...! - खा.सुनिल तटकरे यांचे स्पष्टीकरण

**मुंबई, दि. ५ : प्रतिनिधी**

घात अर्ज दाखल झाले असले तरी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची अजित पवार यांच्याशी एकत्रित चर्चा झाली आहे.त्यामुळे जे-जे मतदारसंघ सोडण्याचे निर्धारित झाले होते त्याठिकाणी एकत्रित काम कसे करता येईल यासाठी युध्दपातळीवर आम्ही प्रयत्न करत आहोत.आणि एक-दोन दिवसात सर्वांची समजूत घालून त्या - त्या मतदारसंघातील वातावरण योग्य पध्दतीने पूरक होईल असा प्रयत्न नक्कीच केला जाईल, असे स्पष्टीकरण राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खा. सुनिल तटकरे यांनी मंगळवारी पक्ष कार्यालयात घेतलेल्या पत्रकार परिषदेत बोलताना दिले.

आमच्यामध्ये फारशी जागांची संख्या नसून ९० ते ९५ टक्के जागांवर महायुतीचे उमेदवार म्हणून उत्तम पध्दतीने काम सुरू झाले आहे.त्यामुळे आजच महायुतीच्या प्रचाराचा शुभारंभ महालक्ष्मीच्या चरणी नतमस्तक होऊन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत कोल्हापूर येथे संध्याकाळी होणार आहे. त्यामुळे २८८ जागांवर महायुती पूर्ण ताकदीने,आणि संपूर्ण शक्तीने एकत्रित निवडणूक लढत आहोत. अन्य ठिकाणी अपक्ष उमेदवार हे भाजप,शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेसचे असतील तर त्यांना समजून सांगण्याचा प्रयत्न नक्कीच करत असून एक - दोन दिवसात नाराजांची समजूत काढण्यात नक्कीच यशस्वी होऊ,असा विश्वासही खा. तटकरे यांनी व्यक्त केला.



शरद पवार यांच्या कुठल्याच वक्तव्यावर मी कोणतीही प्रतिक्रिया देणार नाही असे पत्रकारांच्या प्रश्नांना उत्तर देतानाच बारामतीची जनता सूज्ञ आहे.३० वर्षात अजितदादांनी बारामतीत उभे केलेले प्रचंड काम बारामतीकर नव्हे तर पूणे जिल्हा आणि संपूर्ण महाराष्ट्र विसरू शकत नाही किंवा अनुभवत असून देशभर बारामती पॅटर्नचे कौतुक होत असते.त्यामधील अजितदादांचा जो सहभाग आहे तो सुज्ञ बारामतीकर ठरवतील की, कुणाला प्रतिनिधीत्व करण्याची संधी देऊ.मात्र या विधानसभेत प्रचंड फरकाने अजित पवार हेच निवडून येतील असा ठाम दावाही खा.तटकरे यांनी केला.

राज ठाकरे कधी-कधी त्यांच्या पध्दतीने बोलत असतात.कधी ते विनोद करतात तर कधी मिमिक्री करतात त्यामुळे त्यांचे बोलणे त्याच अर्थाने घ्यावे. त्यापेक्षा काही वेगळे असेल असे मला वाटत नाही असे सांगत,कॉंग्रेसला लोकसभेला मिळालेले यश कुठल्या पध्दतीने डोक्यात गेलेले आहे आणि ते किती जमिनीवर यायला लागले आहे याचे चित्र म्हणजे कोल्हापूरमध्ये काल कॉंग्रेसच्या अधिकृत उमेदवाराने अर्ज माघारी घेतला असा खोचक टोलाही खा.तटकरे यांनी लगावला.

# आज मुंबईत महाविकास आघाडीची संयुक्त सभा, विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराचे रणशिंग फुंकणार!

## मल्लिकार्जून खर्गे, राहुल गांधी, शरद पवार, उद्धव ठाकरेंच्या तोफा धडाडणार

**मुंबई, दि. ५ : प्रतिनिधी**

उमेदवारी अर्ज मागे घेण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी सुरू झाली असून, महाविकास आघाडीच्या बुधवारी मुंबईत होणाऱ्या संयुक्त सभेत, मल्लिकार्जून खर्गे, राहुल गांधी, शरद पवार, उद्धव ठाकरे विद्यमान महायुती सरकारला "चले जाव"चा इशारा देत महासंग्रामाचे रणशिंग फुंकणार आहेत. मल्लिकार्जून खर्गे व राहुल गांधी यांच्या उपस्थितीत उद्या उपराजधानी नागपुर येथे 'संविधान सन्मान संमेलन'ही होणार आहे.

जागावाटपाची मॅरेथॉन चर्चा, बंडखोरांची मनधरणी व उमेदवार अर्ज मागे घेण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर विधानसभेच्या महासंग्रामाचे रण सज्ज झाले असून, प्रचाराची रणधुमाळी सुरू झाली आहे. महाविकास आघाडीची पहिली संयुक्त सभा उद्या मुंबईत होत असून त्यात संघर्षाचा एल्गार होणार आहे. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे व लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी हे उद्या बुधवारी महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येत असून नागपुरात दुपारी १ वाजता 'संविधान सन्मान संमेलनाला' उपस्थित राहणार आहेत. तर संध्याकाळी ५ वाजता मुंबईच्या वांद्रे कुर्ला संकुलातील एमएमआरडीए मैदानात मविआची 'महाराष्ट्र स्वाभिमान सभा' होणार आहे. या सभेला काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विधिमंडळ पक्षनेते बाळासाहेब थोरात, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्यासह महाविकास आघाडीचे प्रमुख नेते उपस्थित राहणार आहेत. या सभेत राहुल गांधी विधानसभा निवडणुकासाठी काँग्रेस पक्षाच्या गॅरंटी जाहीर करणार आहेत, अशी माहिती प्रदेश काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी दिली आहे.

उद्याच्या सभेत काँग्रेस पक्षाच्या गॅरंटी जाहीर केल्या जाणार आहेत. काँग्रेस पक्ष या गॅरंटी महाराष्ट्रातील प्रत्येक घराघरात पोहोचवणार असून महायुतीच्या भ्रष्ट कराभाराबाबत जनजागृती करणार आहे. एकनाथ शिंदे-भाजपा-अजित पवार युती सरकारने महाराष्ट्राचा स्वाभिमान गुजरातकडे गहाण ठेवला आहे, तो परत आणावा लागेल. तसेच भाजपाच्या फेक नेरेटिव्हलाही चोख उत्तर दिले जाईल. काँग्रेसने कर्नाटक विधानसभेच्या निवडणुकीत गॅरंटी जाहीर केल्या व सरकार येताच त्याची अंमलबजावणी सुद्धा केली आहे. तेलंगणातील काँग्रेस सरकारने कोणत्या गॅरंटी जाहीर केल्या व त्याची अंमलबजावणी कशी सुरु आहे हे वर्तमानपत्रात जाहिरात देऊन स्पष्ट केले आहे. त्यामुळे भाजपाच्या फेक नॅरेटिव्हला राज्यातील जनता बळी पडणार नाही, असेही अतुल लोंढे म्हणाले.

# अजित पवार गटाचा आज स्वतंत्र जाहीरनामा

**मुंबई, दि. ५ : प्रतिनिधी**

विधानसभा निवडणूक महायुतीच्या माध्यमातून लढविणाऱ्या उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसने निवडुकीसाठी स्वतंत्र जाहीरनामा तयार केला असून त्याचे प्रकाशन आज, बुधवारी केले जाणार आहे. त्यामुळे विधानसभा निवडणुकीसाठी महायुतीचा एकच असा जाहीरनामा नसेल हे स्पष्ट झाले आहे.

भाजपच्या नेतृत्वाखालील महायुतीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना, अजित पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस हे प्रमुख घटक पक्ष आहेत. महायुतीचा एकच संयुक्त जाहीरनामा प्रकाशित होणे अपेक्षित होते. मात्र, राष्ट्रवादी अजित पवार गटाने स्वतःचा निवडणूक जाहीरनामा प्रकाशित करण्याचा निर्णय घेऊन महायुतीत आघाडी घेतली आहे. त्यामुळे भाजप आणि शिंदे गटाकडूनही स्वतंत्र जाहीरनामे सादर केले जाणार आहेत.

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या उपस्थितीत पक्षाचा निवडणूक जाहीरनामा प्रकशित होईल. वानखेडे स्टेडियम येथील एमसीए लॉन्जमध्ये आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार, राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल, अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ हे दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी होणार आहेत. राज्यात महायुतीचे सरकार पुन्हा सत्तेत आल्यानंतर मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना पुढे सुरु ठेवताना या योजनेच्या निधीत वाढ करण्याचे आश्वासन राष्ट्रवादी काँग्रेसकडून दिले जाण्याची शक्यता आहे. याशिवाय शेतकरी, महिला, युवक, कामगार, कष्टकरी वर्ग तसेच मागासवर्गीय समाज, ओबीसी, अल्पसंख्याक समाजासाठी राष्ट्रवादीच्या जाहीरनाम्यात महत्वाच्या आश्वासनांचा समावेश असण्याची शक्यता आहे.

# राज्यात 6 लाख 41 हजार 425 दिव्यांग मतदार

**मुंबई, दि. ५ : प्रतिनिधी**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी एकूण ६ लाख ४१ हजार ४२५ दिव्यांग मतदारांची नोंदणी झाली आहे. यामध्ये ३ लाख ८४ हजार ६९ पुरुष मतदार, २ लाख ५७ हजार ३१७ महिला दिव्यांग मतदार, तसेच ३९ तृतीयपंथी दिव्यांग मतदारांचा समावेश आहे, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली आहे. पुणे जिल्ह्यात सर्वाधिक दिव्यांग मतदार आहेत. पुणे येथे ८८ हजार ९३७ दिव्यांग मतदार नोंदणीकृत आहेत. यामध्ये ४८ हजार ६२६ पुरुष, ४० हजार ३०१ महिला आणि १० तृतीयपंथी दिव्यांग मतदारांचा समावेश आहे. पुणे पाठोपाठ ठाणे जिल्ह्यात ३८ हजार १४९ दिव्यांग मतदारांची नोंदणी झाली आहे. यामध्ये २१ हजार ५७३ पुरुष मतदार, १६ हजार ५७३ महिला मतदार आणि ३ तृतीयपंथी दिव्यांग मतदार आहेत. दिव्यांग मतदारांची सर्वात कमी नोंदणी गडचिरोली जिल्ह्यात आहे. येथे ६ हजार ४३ दिव्यांग मतदारांची नोंद आहे. यामध्ये ३ हजार ७१० पुरुष आणि २ हजार ३३३ महिला दिव्यांग मतदारांचा समावेश आहे. राज्यात तृतीयपंथी दिव्यांग मतदारांची एकूण संख्या ३९ आहे. सर्वाधिक तृतीयपंथी दिव्यांग मतदार औरंगाबाद जिल्ह्यात आहेत. एकूण १२ तृतीयपंथी दिव्यांग मतदार आहेत. पुणे जिल्ह्यात १०, नांदेड जिल्ह्यात ६, ठाणे जिल्ह्यात ३, आणि पालघर व जळगाव जिल्ह्यात प्रत्येकी २ तृतीयपंथी दिव्यांग मतदारांची नोंदणी झाली आहे. याशिवाय मुंबई उपनगर, लातूर, सोलापूर आणि सांगली या जिल्ह्यांमध्ये प्रत्येकी १ तृतीयपंथी दिव्यांग मतदार नोंदणीकृत आहेत.


ANAND RATHI
आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड
एक्सप्रेस झोन, ए विंग, ८वा मजला, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, गोरेगाव (ई), मुंबई - ४०००६३ भारत
मोबाईल: +918451942710 वेबसाइट:www.rathi.com

**ई-लिलाव विक्री सूचना**

याद्वारे सामान्यत: जनतेला आणि विशेषत: खालील कर्जदार/जामीनदारांना नोटीस देण्यात आली आहे की खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड एआरजीएफएल (सुरक्षित कर्जदार) सोबत सुरक्षित आहे, ज्याचा ताबा देण्यात आला आहे एआरजीएफएल च्या प्राधिकृत अधिकाऱ्याने घेतलेले, ऑनलाइन ई-लिलावाद्वारे https://sarfaesi. auctiontiger.net वेबसाइटद्वारे शेड्यूलमध्ये नमूद केलेल्या तारखेला 'जसे आहे तेथे' आणि 'जसे आहे तसे' आणि 'जे काही आहे ते' आधारावर खाली नमूद केल्याप्रमाणे कर्जदार/जामीनदारांकडून वसुलीच्या तारखेपर्यंत शेड्यूलमध्ये विशेषत: नमूद केलेल्या एकूण रकमेच्या व त्यावरील कराराचे व्याज आणि इतर खर्च आणि शुल्क वसुलीसाठी विकले जाईल.

कर्जदाराचे नाव: (१) एम/एस युनिव्हर्सल फायर इंडस्ट्रीज (कर्जदार) विद्या भवन, दुसरा मजला, प्लॉट नं. १२१, शिवाजी पार्क, केळवस्कर रोड, दादर (प), मुंबई: ४०००२८

सह-कर्जदाराचे नाव: (२) श्री. राहुल एम भंडारे (सहकर्जदार) फ्लॅट क्र. २०२, गोल्डन आर्केड सीएचएसएल, इमारत क्र. एच/३, प्रतीक्षा नगर, सायन पूर्व, मुंबई: ४०००२२. (३) सौ. ए एम भंडारे (सह-कर्जदार) फ्लॅट क्र. २०२, गोल्डन आर्केड सीएचएसएल, इमारत क्र. एच/३, प्रतीक्षा नगर, सायन पूर्व, मुंबई: ४०००२२. (४) सौ. पूजा पोपटराव गायकवाड (सहकर्जदार) फ्लॅट क्र. २०२, गोल्डन आर्केड सीएचएसएल, इमारत क्र. एच/३, प्रतीक्षा नगर, सायन पूर्व, मुंबई: ४०००२२.

मालमत्तेचा पत्ता:- फ्लॅट क्रमांक ५०२, ५वा मजला, अथर्व बिल्डिंग, के के आवरसेकर सीएचएसएल, शिवाजी पार्क, केळुस्कर रोड, डॉ. मधुकर बी राऊत मार्ग, दादर (पश्चिम), मुंबई: ४००२८.

| | |
|---|---|
| थकबाकीची रक्कम (भावी व्याज आणि खर्चासह मागणी सूचनेनुसार) | रु. ७८,७६,४०१/- (रुपये बहात्तर लाख सत्तर सहा हजार चारशे एक फक्त) |
| लिलावाची तारीख | २१ नोव्हेंबर २०२४ |
| राखीव किंमत | रु. ८१,१८,८७३/- (रुपये एकऐंशी लाख अठरा हजार अठ्ठयाहत्तर फक्त) |
| बयाणा पैसे ठेव | राखीव किंमतीच्या १०% |
| किमान बोली वाढीची रक्कम | रु. १०,०००/- |
| इच्छुक खरेदीदारांसाठी मालमत्तेची तपासणी करण्याची तारीख आणि वेळ | १३ नोव्हेंबर २०२४ सकाळी १० ते दुपारी ४ वा |
| केवायसी दस्तऐवज/ईएमडीचा पुरावा इत्यादीसह निविदा फॉर्म सबमिट करण्याची तारीख आणि वेळ. | १९ नोव्हेंबर २०२४ केवायसी कागदपत्रांसह संध्याकाळी ४.०० पर्यंत |
| ऑनलाइन ऑफर उघडण्याची तारीख आणि वेळ | २१ नोव्हेंबर २०२४ सकाळी १०:०० ते दुपारी १.०० दरम्यान |

टीप: इच्छुक बोलीदार/खरेदीदार लिलावाच्या कार्यवाहीसंबंधी तपशीलवार अटी व शर्तीसाठी आनंद राठी ग्रुपच्या www.rathi.com वेबसाइटला भेट देऊ शकतात.

हे प्रकाशन नियम ९(१) किंवा सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, २००२ अंतर्गत वरील कर्जदार/जामीनदारांना दिलेली १५ दिवसांची नोटीस देखील आहे.
तारीख : ०५ नोव्हेंबर २०२४ एसडी/- आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड
ठिकाण : मुंबई अधिकृत स्वाक्षरी



ANAND RATHI
आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड
एक्सप्रेस झोन, ए विंग, ८वा मजला, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, गोरेगाव (ई), मुंबई - ४०००६३ भारत
मोबाईल: +918451942710 वेबसाइट:www.rathi.com

**ई-लिलाव विक्री सूचना**

याद्वारे सामान्यत: जनतेला आणि विशेषत: खालील कर्जदार/जामीनदारांना नोटीस देण्यात आली आहे की खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड एआरजीएफएल (सुरक्षित कर्जदार) सोबत सुरक्षित आहे, ज्याचा ताबा देण्यात आला आहे एआरजीएफएल च्या प्राधिकृत अधिकाऱ्याने घेतलेले, ऑनलाइन ई-लिलावाद्वारे https://sarfaesi. auctiontiger.net वेबसाइटद्वारे शेड्यूलमध्ये नमूद केलेल्या तारखेला 'जसे आहे तेथे' आणि 'जसे आहे तसे' आणि 'जे काही आहे ते' आधारावर खाली नमूद केल्याप्रमाणे कर्जदार/जामीनदारांकडून वसुलीच्या तारखेपर्यंत शेड्यूलमध्ये विशेषत: नमूद केलेल्या एकूण रकमेच्या व त्यावरील कराराचे व्याज आणि इतर खर्च आणि शुल्क वसुलीसाठी विकले जाईल.

कर्जदाराचे नाव: (१) श्री. सुरिंदर एस धीमान (कर्जदार) ए-१/४०४, प्रेस्टिज गार्डन, नितीन कंपनी कंपाउंड, पाचपाखडी, ठाणे: ४००६०१. महाराष्ट्र.

सह-कर्जदाराचे नाव: (२) श्रीमती सरबजीत धिमन (सह-कर्जदार) ए-१/४०४, प्रेस्टीज गार्डन, नितीन कंपनी कंपाउंड, पाचपाखडी, ठाणे: ४००६०१. महाराष्ट्र.

वेळापत्रक

मालमत्तेचा पत्ता:- न्यू डायमंड सीएचएसएल, फ्लॅट नं. १०५ आणि १०६, पहिला मजला, बी विंग, लुईस वाडी, हजुरी दर्गा रोड, ऑफ. मोहन कोपेकर रोड, ठाणे (पश्चिम), ठाणे ४००६०३.

| | |
|---|---|
| थकबाकीची रक्कम (भावी व्याज आणि खर्चासह मागणी सूचनेनुसार) | रु. ७१,९२,२७५/- (रुपये बहात्तर लाख बयाणाव हजार दोनशे पंचाहत्तर फक्त) |
| लिलावाची तारीख | २१ नोव्हेंबर २०२४ |
| राखीव किंमत | रु. ८१,४०,५००/- (रुपये एक्काशी लाख पंचेचाळीस हजार पाचशे फक्त) |
| बयाणा पैसे ठेव | राखीव किंमतीच्या १०% |
| किमान बोली वाढीची रक्कम | रु. १०,०००/- |
| इच्छुक खरेदीदारांसाठी मालमत्तेची तपासणी करण्याची तारीख आणि वेळ | १३ नोव्हेंबर २०२४ सकाळी १० ते दुपारी ४ वा |
| केवायसी दस्तऐवज/ईएमडीचा पुरावा इत्यादीसह निविदा फॉर्म सबमिट करण्याची तारीख आणि वेळ. | १९ नोव्हेंबर २०२४ केवायसी कागदपत्रांसह संध्याकाळी ४.०० पर्यंत |
| ऑनलाइन ऑफर उघडण्याची तारीख आणि वेळ | २१ नोव्हेंबर २०२४ सकाळी १०:०० ते दुपारी १.०० दरम्यान |

टीप: इच्छुक बोलीदार/खरेदीदार लिलावाच्या कार्यवाहीसंबंधी तपशीलवार अटी व शर्तीसाठी आनंद राठी ग्रुपच्या www.rathi.com वेबसाइटला भेट देऊ शकतात.

हे प्रकाशन नियम आणि ९(१) किंवा सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, २००२ अंतर्गत वरील कर्जदार/जामीनदारांना दिलेली १५ दिवसांची नोटीस देखील आहे.
तारीख : ०४ नोव्हेंबर २०२४ एसडी/- आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड
ठिकाण : ठाणे अधिकृत स्वाक्षरी



ANAND RATHI
आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड
एक्सप्रेस झोन, ए विंग, ८वा मजला, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, गोरेगाव (ई), मुंबई - ४०००६३ भारत
मोबाईल: +917400462994 वेबसाइट:www.rathi.com

**ई-लिलाव विक्री सूचना**

याद्वारे सामान्यत: जनतेला आणि विशेषत: खालील कर्जदार/जामीनदारांना नोटीस देण्यात आली आहे की खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड एआरजीएफएल (सुरक्षित कर्जदार) सोबत सुरक्षित आहे, ज्याचा ताबा देण्यात आला आहे एआरजीएफएल च्या प्राधिकृत अधिकाऱ्याने घेतलेले, ऑनलाइन ई-लिलावाद्वारे https://sarfaesi. auctiontiger.net वेबसाइटद्वारे शेड्यूलमध्ये नमूद केलेल्या तारखेला 'जसे आहे तेथे' आणि 'जसे आहे तसे' आणि 'जे काही आहे ते' आधारावर खाली नमूद केल्याप्रमाणे कर्जदार/जामीनदारांकडून वसुलीच्या तारखेपर्यंत शेड्यूलमध्ये विशेषत: नमूद केलेल्या एकूण रकमेच्या व त्यावरील कराराचे व्याज आणि इतर खर्च आणि शुल्क वसुलीसाठी विकले जाईल.

कर्जदाराचे नाव: (१) श्री. अय्यंगार साईप्रशांत (कर्जदार), १५/१३, ऐश्वर्या सीएचएस, रोड नं ४, पेस्टोम सागर चेंबूर, टिळक नगर, मुंबई-४०००८९.

सह-कर्जदाराचे नाव: (२) श्री. विजयलक्ष्मण शंकर थेवर (जामीनदार), १५/१३, ऐश्वर्या सी.एच.एस., रोड क्र. ४, पेस्टोम सागर चेंबूर, टिळक नगर, मुंबई-४०००८९

वेळापत्रक: फ्लॅट नं.१५, तळमजला, बी विंग, ऐश्वर्या सी.एचएस.एल, पेस्टम सागर रोड नं.४ शॉपर स्टॉपजवळ, चेंबूर पश्चिम, मुंबई: ४०० ०८९.

| | |
|---|---|
| थकबाकीची रक्कम (भावी व्याज आणि खर्चासह मागणी सूचनेनुसार) | रु.३३,२८,४२३/- (रुपये तेहतीस लाख अठ्ठावीस हजार चारशे तेवीस फक्त) |
| लिलावाची तारीख | २१ नोव्हेंबर २०२४ |
| राखीव किंमत | रु. ७९,८६,६००/- (रुपये बहात्तर लाख छ्याऐंशी हजार सहाशे फक्त) |
| बयाणा पैसे ठेव | राखीव किंमतीच्या १०% |
| किमान बोली वाढीची रक्कम | रु. १०,०००/- |
| इच्छुक खरेदीदारांसाठी मालमत्तेची तपासणी करण्याची तारीख आणि वेळ | ३ नोव्हेंबर २०२४ सकाळी १० ते दुपारी ४ वा |
| केवायसी दस्तऐवज/ईएमडीचा पुरावा इत्यादीसह निविदा फॉर्म सबमिट करण्याची तारीख आणि वेळ. | १९ नोव्हेंबर २०२४ केवायसी कागदपत्रांसह संध्याकाळी ४.०० पर्यंत |
| ऑनलाइन ऑफर उघडण्याची तारीख आणि वेळ | २१ नोव्हेंबर २०२४ सकाळी १०:०० ते दुपारी १.०० दरम्यान |

टीप: इच्छुक बोलीदार/खरेदीदार लिलावाच्या कार्यवाहीसंबंधी तपशीलवार अटी व शर्तीसाठी आनंद राठी ग्रुपच्या www.rathi.com वेबसाइटला भेट देऊ शकतात.

हे प्रकाशन नियम ८(६) आणि ९(१) किंवा सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, २००२ अंतर्गत वरील कर्जदार/जामीनदारांना दिलेली ३० दिवसांची नोटीस देखील आहे.
तारीख : ०५ नोव्हेंबर २०२४ एसडी/- आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड
ठिकाण : मुंबई अधिकृत स्वाक्षरी



ANAND RATHI
आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड
एक्सप्रेस झोन, ए विंग, ८वा मजला, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, गोरेगाव (ई), मुंबई - ४०००६३ भारत
मोबाईल: +918451942710 वेबसाइट:www.rathi.com

**ई-लिलाव विक्री सूचना**

याद्वारे सामान्यत: जनतेला आणि विशेषत: खालील कर्जदार/जामीनदारांना नोटीस देण्यात आली आहे की खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड एआरजीएफएल (सुरक्षित कर्जदार) सोबत सुरक्षित आहे, ज्याचा ताबा देण्यात आला आहे एआरजीएफएल च्या प्राधिकृत अधिकाऱ्याने घेतलेले, ऑनलाइन ई-लिलावाद्वारे https://sarfaesi. auctiontiger.net वेबसाइटद्वारे शेड्यूलमध्ये नमूद केलेल्या तारखेला 'जसे आहे तेथे' आणि 'जसे आहे तसे' आणि 'जे काही आहे ते' आधारावर खाली नमूद केल्याप्रमाणे कर्जदार/जामीनदारांकडून वसुलीच्या तारखेपर्यंत शेड्यूलमध्ये विशेषत: नमूद केलेल्या एकूण रकमेच्या व त्यावरील कराराचे व्याज आणि इतर खर्च आणि शुल्क वसुलीसाठी विकले जाईल.

कर्जदाराचे नाव: (१) श्री. अरविंद फुसाराम आचर्या, पुसा राम, फ्लॅट क्र. १११४, एमएमआरडीए ए विंग, भाईंदर पाडा, लोढा स्प्लेंडोरा, ठाणे ४००६१५

सह-कर्जदाराचे नाव: (२) श्रीमती पूजा अरविंद आचरिया, पुसा राम, फ्लॅट क्र. १११४, एमएमआरडीए ए विंग, भाईंदर पाडा, लोढा स्प्लेंडोरा, ठाणे ४००६१५

वेळापत्रक: मालमत्तेचा पत्ता: फ्लॅट नं.७०५, ७वा मजला, बी विंग, देवकीबाई सदन सीएचएसएल, बाळकुम पाडा, ऑफ. साकेत रोड, सर्व्हेनंबर १६८, हिसा नंबर १ गाव बाळकुम, जिल्हा: ठाणे, ठाणे पश्चिम:- ४००६०८

| | |
|---|---|
| थकबाकीची रक्कम (भावी व्याज आणि खर्चासह मागणी सूचनेनुसार) | रु. ३१,१३,१०२/- (रुपये एकतीस लाख तेरा हजार एकशे दोन फक्त) |
| लिलावाची तारीख | २१ नोव्हेंबर २०२४ |
| राखीव किंमत | रु. २९,२४,५०५/- (रुपये एकोणतीस लाख चोवीस हजार पाचशे पाच फक्त) |
| बयाणा पैसे ठेव | राखीव किंमतीच्या १०% |
| किमान बोली वाढीची रक्कम | रु. १०,०००/- |
| इच्छुक खरेदीदारांसाठी मालमत्तेची तपासणी करण्याची तारीख आणि वेळ | १३ नोव्हेंबर २०२४ सकाळी १० ते दुपारी ४ वा |
| केवायसी दस्तऐवज/ईएमडीचा पुरावा इत्यादीसह निविदा फॉर्म सबमिट करण्याची तारीख आणि वेळ. | १९ नोव्हेंबर २०२४ दुपारी ४.०० पर्यंत केवायसी कागदपत्रांसह |
| ऑनलाइन ऑफर उघडण्याची तारीख आणि वेळ | २१ नोव्हेंबर २०२४ सकाळी १०:०० ते दुपारी १.०० दरम्यान |

टीप: इच्छुक बोलीदार/खरेदीदार लिलावाच्या कार्यवाहीसंबंधी तपशीलवार अटी व शर्तीसाठी आनंद राठी ग्रुपच्या www.rathi.com वेबसाइटला भेट देऊ शकतात.

हे प्रकाशन नियम ८(६) आणि ९(१) किंवा सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, २००२ अंतर्गत वरील कर्जदार/जामीनदारांना दिलेली १५ दिवसांची नोटीस देखील आहे.
तारीख : ०५ नोव्हेंबर २०२४ एसडी/- आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड
ठिकाण : मुंबई अधिकृत स्वाक्षरी



ANAND RATHI
आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड
एक्सप्रेस झोन, ए विंग, ८वा मजला, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, गोरेगाव (ई), मुंबई - ४०००६३ भारत
मोबाईल: +918451942710 वेबसाइट:www.rathi.com

**ई-लिलाव विक्री सूचना**

याद्वारे सामान्यत: जनतेला आणि विशेषत: खालील कर्जदार/जामीनदारांना नोटीस देण्यात आली आहे की खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड एआरजीएफएल (सुरक्षित कर्जदार) सोबत सुरक्षित आहे, ज्याचा ताबा देण्यात आला आहे एआरजीएफएल च्या प्राधिकृत अधिकाऱ्याने घेतलेले, ऑनलाइन ई-लिलावाद्वारे https://sarfaesi. auctiontiger.net वेबसाइटद्वारे शेड्यूलमध्ये नमूद केलेल्या तारखेला 'जसे आहे तेथे' आणि 'जसे आहे तसे' आणि 'जे काही आहे ते' आधारावर खाली नमूद केल्याप्रमाणे कर्जदार/जामीनदारांकडून वसुलीच्या तारखेपर्यंत शेड्यूलमध्ये विशेषत: नमूद केलेल्या एकूण रकमेच्या व त्यावरील कराराचे व्याज आणि इतर खर्च आणि शुल्क वसुलीसाठी विकले जाईल.

कर्जदाराचे नाव: (१) एम/एस वछल इंजिनियरिंग टेक्नोक्रॅट्स (कर्जदार), ए/४, जे प्रभा सीएचएसएल, साई भक्ती मार्ग, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई: ४०० ०२५.

सह-कर्जदारांची नावे: (२) श्री. संजय हरिभन सिंग (सह-कर्जदार), ए/४, जय प्रभा सीएचएसएल, साई भक्ती मार्ग, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई: ४०० ०२५. (३) श्री. रणजीत संजय सिंग (सह-कर्जदार), ए/४, जय प्रभा सीएचएसएल, साई भक्ती मार्ग, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई: ४०० ०२५. (४) सौ. पुष्पा संजय सिंग (सह-कर्जदार), ए/४, जय प्रभा सीएचएसएल, साई भक्ती मार्ग, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई: ४०००२५ (५) श्री. हरिभन सिंग (सह-कर्जदार), ए/४, जय प्रभा सीएचएसएल, साई भक्ती मार्ग, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई: ४०० ०२५.(६) श्री. अमरजीत संजय सिंग (सह-कर्जदार), ए/४, जय प्रभा सीएचएसएल, साई भक्ती मार्ग, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई: ४०० ०२५.

वेळापत्रक: फ्लॅट नं. १०, तिसरा मजला, मंदार, वज्रेश्वरी सीएचएसएल, वीर सावरकर मार्ग, पोस्ट ऑफिस जवळ, दादर पश्चिम, मुंबई: ४०० ०२८.

| | |
|---|---|
| थकबाकीची रक्कम (भावी व्याज आणि खर्चासह मागणी सूचनेनुसार) | रु. ५४,८७,०८९/- (रुपये चौपन्न लाख सत्ताऐंशी हजार एकोणपन्नास फक्त) |
| लिलावाची तारीख | २१ नोव्हेंबर २०२४ |
| राखीव किंमत | रु. १,२२,८६,०८०/- (रुपये एक कोटी बावीस लाख सहाऐंशी हजार ऐंशी फक्त) |
| बयाणा पैसे ठेव | राखीव किंमतीच्या १०% |
| किमान बोली वाढीची रक्कम | रु. १०,०००/- |
| इच्छुक खरेदीदारांसाठी मालमत्तेची तपासणी करण्याची तारीख आणि वेळ | १३ नोव्हेंबर २०२४ सकाळी १० ते दुपारी ४ वा |
| केवायसी दस्तऐवज/ईएमडीचा पुरावा इत्यादीसह निविदा फॉर्म सबमिट करण्याची तारीख आणि वेळ. | १९ नोव्हेंबर २०२४ दुपारी ४.०० पर्यंत केवायसी कागदपत्रांसह |
| ऑनलाइन ऑफर उघडण्याची तारीख आणि वेळ | २१ नोव्हेंबर २०२४ सकाळी १०:०० ते दुपारी १.०० दरम्यान |

टीप: इच्छुक बोलीदार/खरेदीदार लिलावाच्या कार्यवाहीसंबंधी तपशीलवार अटी व शर्तीसाठी आनंद राठी ग्रुपच्या www.rathi.com वेबसाइटला भेट देऊ शकतात.

हे प्रकाशन नियम ८(६) आणि ९(१) किंवा सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, २००२ अंतर्गत वरील कर्जदार/जामीनदारांना दिलेली १५ दिवसांची नोटीस देखील आहे.
तारीख : ०५ नोव्हेंबर २०२४ एसडी/- आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड
ठिकाण : मुंबई अधिकृत स्वाक्षरी



ANAND RATHI
आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड
एक्सप्रेस झोन, ए विंग, ८वा मजला, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, गोरेगाव (ई), मुंबई - ४०००६३ भारत
मोबाईल: +918451942710 वेबसाइट:www.rathi.com

**ई-लिलाव विक्री सूचना**

याद्वारे सामान्यत: जनतेला आणि विशेषत: खालील कर्जदार/जामीनदारांना नोटीस देण्यात आली आहे की खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड एआरजीएफएल (सुरक्षित कर्जदार) सोबत सुरक्षित आहे, ज्याचा ताबा देण्यात आला आहे एआरजीएफएल च्या प्राधिकृत अधिकाऱ्याने घेतलेले, ऑनलाइन ई-लिलावाद्वारे https://sarfaesi. auctiontiger.net वेबसाइटद्वारे शेड्यूलमध्ये नमूद केलेल्या तारखेला 'जसे आहे तेथे' आणि 'जसे आहे तसे' आणि 'जे काही आहे ते' आधारावर खाली नमूद केल्याप्रमाणे कर्जदार/जामीनदारांकडून वसुलीच्या तारखेपर्यंत शेड्यूलमध्ये विशेषत: नमूद केलेल्या एकूण रकमेच्या व त्यावरील कराराचे व्याज आणि इतर खर्च आणि शुल्क वसुलीसाठी विकले जाईल.

कर्जदाराचे नाव: (१) एम/एस सीजीएन न्यूट्रासिटिकल (कर्जदार), सी-४०३, ४था मजला, गायत्री शिवम आशा नगर, ९० फीट रोड, ठाकूर कॉम्प्लेक्स, कांदिवली पूर्व, मुंबळ-४००१०१

सह-कर्जदाराचे नाव: (२) श्री. गुरुदत्त मनोहर काडगे (सह-कर्जदार), सी-४०३, ४था मजला, गायत्री शिवम आशा नगर, ९० फूट रोड, ठाकूर कॉम्प्लेक्स, कांदिवली पूर्व, मुंबई-४००१०१. (३) सौ. धनश्री गुरुदत्त काडगे (सह-कर्जदार), सी-४०३, ४था मजला, गायत्री शिवम आशा नगर, ९० फूट रोड, ठाकूर कॉम्प्लेक्स, कांदिवली पूर्व, मुंबई-४००१०१

वेळापत्रक: मालमत्तेचा पत्ता:- फ्लॅट क्र. ४०३, ०४ वा मजला, सी विंग, इमारत क्रमांक ०२, गायत्री शिवम सीएचएसएल, आशा नगर, ९० फूट रोड, सीटीएस क्रमांक ६३८/ए गाव पोईसर, बोरिवली (ई), मुंबई-४०००६६.

| | |
|---|---|
| थकबाकीची रक्कम (भावी व्याज आणि खर्चासह मागणी सूचनेनुसार) | रु. ८८,४६,७२२/- (रुपये ऐंशी लाख छचाळीस हजार सातशे बावीस फक्त) |
| लिलावाची तारीख | २१ नोव्हेंबर २०२४ |
| राखीव किंमत | रु. १,३४,३९,५२०/- (रुपये एक कोटी चौतीस लाख एकोणतीस हजार पाचशे पंचवीस फक्त) |
| बयाणा पैसे ठेव | राखीव किंमतीच्या १०% |
| किमान बोली वाढीची रक्कम | रु. १०,०००/- |
| इच्छुक खरेदीदारांसाठी मालमत्तेची तपासणी करण्याची तारीख आणि वेळ | १३ नोव्हेंबर २०२४ सकाळी १० ते दुपारी ४ वा |
| केवायसी दस्तऐवज/ईएमडीचा पुरावा इत्यादीसह निविदा फॉर्म सबमिट करण्याची तारीख आणि वेळ. | १९ नोव्हेंबर २०२४ दुपारी ४.०० पर्यंत केवायसी कागदपत्रांसह |
| ऑनलाइन ऑफर उघडण्याची तारीख आणि वेळ | २१ नोव्हेंबर २०२४ सकाळी १०:०० ते दुपारी १.०० दरम्यान |

टीप: इच्छुक बोलीदार/खरेदीदार लिलावाच्या कार्यवाहीसंबंधी तपशीलवार अटी व शर्तीसाठी आनंद राठी ग्रुपच्या www.rathi.com वेबसाइटला भेट देऊ शकतात.

हे प्रकाशन नियम ८(६) आणि ९(१) किंवा सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, २००२ अंतर्गत वरील कर्जदार/जामीनदारांना दिलेली १५ दिवसांची नोटीस देखील आहे.
तारीख : ०५ नोव्हेंबर २०२४ एसडी/- आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड
ठिकाण : मुंबई अधिकृत स्वाक्षरी